गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक २३७ वा | मंगळवार १६ जानेवारी २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 237 | Date : 16/01/2024 | blow :Tuesday | Page 4 | Price 4

## राहुल नार्वेकरांच्या निकालाविरोधात ठाकरे गटाची सर्वोच्च न्यायालयात धाव

मुंबई : आमदार अपात्रता प्रकरणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी १० जानेवारी रोजी महत्त्वाच्या निकालाचं वाचन केलं. त्यानुसार, ठाकरे आणि शिंदे गटातील आमदार अनपेक्षितपणे पात्र ठरले असून खरी शिवसेना म्हणून शिंदे गटाला मान्यता देण्यात आली. त्यामुळे ठाकरे गट आक्रमक झाला आहे. याविरोधात कायदेविषयक लढाई लढण्याकरता त्यांनी आता सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले आहे. ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात या निकालाविरोधात याचिका दाखल केली असल्याचे वृत्त कायदेशीर वृत्तस्थळ असलेल्या लाईव्ह लॉने दिले आहे. दरम्यान, ठाकरे गटाने ऑनलाईन याचिका दाखल केली आहे.



मे २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने आमदार अपात्रता प्रकरण विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे सोपवलं. तसंच, मर्यादित कालावधीत याबाबतचा निकाल देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, या सुनावणीला जून महिन्याच्या अखेरीस प्रत्यक्षात सुरुवात झाली. परंतु, ही सुनवाणी अखंडित होऊ शकली नाही. सुनावणीला वेग यावा आणि लवकर निकाल लागावा म्हणून ठाकरे गटाने पुन्हा सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले. त्यामुळे सर्वोच्च न्यायलयाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना पुन्हा मर्यादित काळात निकाल देण्याचे आदेश दिले. त्यानुसार, सुनावणी सुरू झाली. दोन्ही गटांचा युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर याप्रकरणी ३१ डिसेंबरपर्यंत निकाल लागण्याची शक्यता होती. पंरतु, राहुल नार्वेकर यांनी पुन्हा वेळ वाढवून मागितला.

राहुल नार्वेकरांची मागणी सर्वोच्च न्यायालयाने मान्य केली आणि १० जानेवारीपर्यंत निकाल देण्याचे आदेश दिले. त्यानुसार, बहुप्रतिक्षित अशा या निकालाचं वाचन १० जानेवारी रोजी मुंबईतील विधानभवनात झाले. त्यानुसार, । पान २ वर

## आंध्र प्रदेश काँग्रेसमध्ये मोठी उलथापालथ, प्रदेशाध्यक्षांचा राजीनामा

### पक्षाची कमान जगन मोहन रेड्डींच्या बहिणीकडे



मुंबई : दक्षिण मुंबईचे माजी खासदार मिलिंद देवरा यांनी दोन दिवसांपूर्वी काँग्रेस पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे महाराष्ट्र काँग्रेसमध्ये मोठी खळबळ उडाली होती. त्यापाठोपाठ आता आंध्र प्रदेश काँग्रेसमध्ये मोठी उलथापालथ सुरू झाली आहे. आंध्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष गिडुगू रुद्र राजू यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. राजू हे प्रदेशाध्यक्षपदावरून पायउतार झाल्याने वाय. एस. शर्मिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदी विराजमान होऊ शकतात. वाय. एस. शर्मिला या आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री वाय. एस. जगनमोहन रेड्डी यांच्या थोरल्या भगिनी आहेत. त्यांनी ४ जानेवारी रोजी काँग्रेसमध्ये। पान २ वर

## राज्यातील धार्मिक स्थळांच्या, शहरालगतच्या ग्रामीण भागाच्या स्वच्छतेसाठी कायमस्वरुपी योजना राबवणार : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई : राज्यातील सर्व धार्मिक स्थळांना लाखोच्या संख्येने भाविक भेट देत असतात. भाविकांचे श्रद्धास्थान असणारे ही ठिकाणे स्वच्छ आणि सुंदर राहिली पाहिजेत. त्यासाठी या धार्मिक स्थळांच्या स्वच्छतेसाठी कायमस्वरुपी योजना राबविण्याची आणि यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. येत्या २२ जानेवारीला अयोध्या येथे होणाऱ्या श्री राम मंदिराच्या प्राण प्रतिष्ठापनेची बाब आपणासाठी अभिमानाची असून त्याबद्दल आनंद व्यक्त केला पाहिजे असेही ते म्हणाले.



राज्यातील धार्मिक स्थळांमध्ये स्वच्छता अभियान राबविणे, शहरी आणि ग्रामीण भागातील डीप क्लिनिंग मोहिम आणि महिला सशक्तीकरण अभियान यांच्याविषयीची आढावा बैठक वर्षा शासकीय निवासस्थान येथे झाली. यावेळी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. या बैठकीला राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासह, विविध विभागांचे सचिव, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिकांचे आयुक्त दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, राज्यातील धार्मिक स्थळांवरील इमारतींची स्वच्छता संबधित ट्रस्टमार्फत होत असते. परंतू बाहेरील भागात अस्वच्छता कायम राहते. यामुळे भाविकांना त्रास होत असतो. याची गंभीर दखल घेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी धार्मिक स्थळांना स्वच्छ आणि सुंदर बनविण्याचे आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद देत राज्यात तातडीने जिल्हाधिकारी यांच्या पुढाकारातून धार्मिक स्थळांची स्वच्छता मोहिम राबवावी. तसेच मंदिर परिसरात विशेष स्वच्छता मोहिम राबवून विद्युत रोषणाई करण्यात यावी. । पान २ वर

## एकाच दिवशी देशाचे दोन मोठे नेते सोलापुरात, १९ जानेवारीला शरद पवारही दौऱ्यावर



सोलापूर : नाशिक आणि मुंबई दौऱ्यानंतर पुढच्याच आठवड्यात पुन्हा एकदा पंतप्रधान मोदी महाराष्ट्र दौऱ्यावर येतायत. सोलापूर शहरात १९ जानेवारी रोजी त्यांचा रोड शो आणि रे कॉलनीच्या कार्यक्रमासाठी येत आहेत. त्याच दिवशी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी सांगोला आणि मंगळवेढा येथे कार्यक्रम घेतल्याने सोलापूर जिल्ह्याचे राजकीय वातावरण चांगलचं तापलं असल्याचं पाहायला मिळतं आहे.

या दोन मोठ्या नेत्यांच्या दौऱ्यामुळे अनेक राजकीय उलथापालथी होण्याची शक्यता आहे. दरम्यान या दौऱ्यावेळी शरद पवार हे सोलापूर जिल्ह्यातील मतदारसंघाची राजकीय गणितं जुळवणार का हे पाहवं लागणार आहे. शरद पवार यांच्या सोबत माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे देखील उपस्थित राहणार आहेत. तसेच शरद पवारांचे जुने सहकारी आणि माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्यासह राष्ट्रवादी अजित पवार गटाचे जिल्ह्यातील आमदारही हजेरी लावणार असल्याची माहिती मिळतेय. त्यामुळे सोलापुरात त्या दिवशी राजकीय फटकेबाजी पाहायला मिळणार असल्याचं म्हटलं जातंय.

सांगोल्याचे माजी आमदार कै डॉ गणपतराव देशमुख यांच्या स्मरणार्थ त्यांचे नातू डॉ अनिकेत देशमुख यांनी गणेशरत्न राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. यासाठी । पान २ वर'

## पंतप्रधान नरेंद्र मोदी संविधान बदलणार ही काँग्रेसची अफवा; केंद्रीय मंत्री रामदास आठवलेंचं वक्तव्य

वाशिम : पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भारताचे संविधान बदलणार आहेत ही म्हणजे निव्वळ अफवा आहे. देशात काँग्रेस आणि इतर विरोधी पक्ष मिळून समाजात गैरसमज पसरवत आहेत. ही एक काँग्रेसची खेळी असून जनतेने काँग्रेसच्या या खेळीला बळी पडू नये. कारण संविधान बदलणे हे कुणालाही शक्य नाही. संविधान अत्यंत मजबूत आहे. पंतप्रधानांनी संसद भवनाला संविधान सदन असे नाव दिले आहे. त्यामुळे जनतेने काँग्रेसच्या अफवेला बळी पडू नये, असे आवाहन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले. आज वाशिम येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या वतीने भूमी हक्क परिषद आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते.



देशात सध्या आगामी लोकसभा निवडणुकांचे वारे वाहू लागले आहेत. सर्वच पक्षांनी लोकसभेसाठी कंबर कसली आहे. लोकसभेसाठी आता जवळपास सर्वच पक्षांनी दावे-प्रतिदावे करण्यास सुरुवात केली आहे. अशातच, केंद्रीय मंत्री रामदास आठवले आज १५ जानेवारीला वाशिम जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी रामदास आठवले बोलत होते. । पान २ वर

## सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने महसूल व पोलीस विभागाने परस्पर समन्वय ठेवावा : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

### जिल्ह्यात ३ हजार ५९९ मतदान केंद्र तर ३५ लाख ७८ हजार मतदार

सोलापूर/प्रतिनिधीः सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने सर्व सहायक निवडणूक अधिकारी, नोडल अधिकारी व पोलीस विभाग यांच्यात परस्पर चांगला समन्वय असला पाहिजे. हाच समन्वय निवडणूक यशस्वी होण्यासाठी महत्वाचा असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने आयोजित पूर्वतयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद बोलत होते. यावेळी पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उप जिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, पोलीस उप आयुक्त अजित बिऱ्हाडे, मनपा उपायुक्त निखिल मोरे, सर्व सहायक निवडणूक अधिकारी, उप विभागीय पोलीस अधिकारी, सर्व नोडल अधिकारी, तहसिलदार आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले की, जिल्ह्यात एकूण ३ हजार ५९९ मतदान केंद्र असून मागील लोकसभा निवडणुकीमध्ये एकही व्हलनेरबेल मतदान केंद्र नव्हते. यावेळी अशा मतदान केंद्राबाबत महसूल व पोलीस विभागाने निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे तपासणी करावी व त्याची यादी तयार करून ठेवावी. तसेच प्रतिबंधात्मक कारवाईच्या अनुषंगाने कलम १०७, ११० च्या प्रलंबित केसेस त्वरित निकाली काढाव्यात, अशा सूचना त्यांनी केल्या.

सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने सर्व नोडल अधिकारी, सहायक निवडणूक अधिकारी व विभागाच्या अधिकाऱ्यांनी निवडणूकीत त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी चोखपणे पार पाडावी. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे । पान २ वर



# संपादकीय

## राजकीय निकाल...

राहुल नार्वेकर यांनी अलीकडेच राज्यातील सत्ता संघर्षावर अंतिम निवाडा केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांच्यासह वेगळी वाट निवडणारे सर्व आमदार थेट अपात्र ठरविण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला होता. संबंधित आमदारांच्या पात्रतेसंदर्भात विधानसभेच्या अध्यक्षांनी निर्णय करेपर्यंत सभागृहातील त्यांचे लोकप्रतिनिधी या नात्याने अधिकार कायम राहणार होते. जर तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरेंनी आपल्या पदाचा स्वतःहून राजीनामा दिला नसता तर आम्ही पूर्वस्थिती आणण्याबाबत विचार करू शकलो असतो, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. त्याचा अर्थ उध्दव यांनी राजीनामा दिला नसता तर सर्वोच्च न्यायालयाने ठाकरेंनाच पुनः मुख्यमंत्रिपदी स्थानापन्न केले असते, असेही समजण्याचे काही कारण नाही. आम्ही त्याबाबत विचार केला असता; म्हणजेच त्या मुद्द्यावर खल झाला असता, इतकेच न्यायालयाला म्हणायचे होते. त्यातून न्यायालयाने नेमका निर्णय काय केला असता याविषयी कोणताही ठोस अंदाज लावणे चुकीचे ठरेल. राज्यपालांनी बोलावलेली बहुमत चाचणी झालीच नाही, त्यामुळे जी घटना घडलीच नाही, त्याविषयी विचार करणे न्यायालयाला शक्य नाही, हेच निकालपत्राने वेगळ्या शब्दात मांडले आहे. ज्या घटना घडलेल्या नाहीत ती चूक की बरोबर, हे ठरवणे कोणत्याही न्यायालयाला न्यायनीतितत्त्व शास्त्रानुसार शक्यच नसते. उध्दव यांच्या सरकारची बहुमत चाचणी झालीच नव्हती त्यामुळे परिस्थिती पूर्ववत करण्याबाबत न्यायालय विचार करू शकत नाही, असे निकालपत्रात लिहिले होते. त्याचा अर्थ ठाकरेंनी राजीनामा दिला नसता तर न्यायालयाने त्यांना पुन्हा मुख्यमंत्री केले असते, असा काढणे सपशेल चुकीचे ठरेल. त्याउपरही बहुमत चाचणीला सामोरे गेल्यावर ठाकरेंच्या बाजूने महाविकास आघाडीचे सर्व आमदार उभे राहणार होते का, हा प्रश्नही तपासून पाहायला हवा. नार्वेकर यांच्या विधानसभा अध्यक्षपदाच्या निवडीवेळेस शिंदे यांच्या बहुमत चाचणीच्या वेळी काँग्रेसचेच काही आमदार उशिरा पोहचले होते, हे विसरून कसे चालेल. बहुमत चाचणीला सामोरे जाण्याची परिस्थिती तत्कालीन राज्यपालांच्या आदेशामुळे निर्माण झाली, हे खरे असले तरीही ठाकरेंच्या बहुमताची चाचणी सभागृहातच झाली असती. एखाद्या आमदाराच्या अपात्रतेविषयी केल्या जाणाऱ्या निर्णयाचा त्यांनी त्यापूर्वी सभागृहात केलेल्या मतदानावर अथवा घेतलेल्या भूमिकेवर कोणताही परिणाम होत नाही, हे तत्त्व संविधानात अंतर्भूत आहे व न्यायालयाने निकालपत्रात त्याचा उल्लेखदेखील केला आहेच.

# शौर्यांच्या जयस्तंभालाच भिती

कोरेगाव भिमा येथील शौर्य चे प्रतिक असलेला जयस्तंभालाच भिती निर्माण झाली आहे. हि सत्य घटना अनेक लोकांना माहीतीच नाही. १८१८ साली अन्याय, अत्याचार करून विषमतावादी पेशवाई पाचशे शुरविरांनी संपवून टाकली. हा जागतिक पराक्रम कोरेगाव भिमाच्या जयस्तंभामुळे आजही आपल्या समोर आहे. पाचशे शुर योद्ध्यांनी अठ्ठावीस हजार पेशव्यांचा पराभव करून अन्याय अत्याचाराचा बदला घेऊन त्यांचे वर्चस्वच संपवून टाकले. कोरेगाव भिमाची लढाई ही केवळ सत्तेची लढाई नव्हती तर अस्तित्व आणि अस्मितेची होती. ज्या लढाईने शुरविरांचे अस्तित्व दाखवून दिले त्याच अस्तीत्वाची निशाणी अर्थात कोरेगाव भिमाचा जयस्तंभ आज अडचणी मध्ये आहे. दर वर्षी एक जानेवारी ला लाखोंच्या संख्येने कोरेगाव भिमाला जाणाऱ्या लोकांना आजही जर कोरेगाव भिमाच्या जयस्तंभाबद्दल, तेथील अडचणी बद्दल माहिती नसेल तर हि खुप मोठी शोकांतिका आहे. आपण एक जानेवारी कोरेगाव भिमा, विजयादशमी नागपूर, चौदा जानेवारी औरंगाबाद, सहा डिसेंबर मुंबई ला लाखोंच्या संख्येने जमतो आणि दुसऱ्या दिवशी शांत होतो. भिमजयंती प्रत्येक गावात प्रत्येक बौद्ध घरात साजरी केली जाते, हजारो लाखो रुपये खर्च केले जातात, नाचगाणे, मनोरंजन करून दिवस जगुन स्वतः ला आंबेडकरवादी स्वतः च म्हणवून घेण्यात धन्यता मानतो. परंतु एकत्र यायचे कशासाठी? ह्या प्रश्नाचे उत्तर कोणीच शोधले नाही. केवळ इतर लोक जत्रा यात्रा यामध्ये एकत्र जमतात तसेच आपण वरील ठिकाणी जमुन जत्रा यात्रा साजरी करत असु तर आपण अधोगतीकडे वाटचाल करत आहोत हे लक्षात घ्या. आंबेडकरवादी चळवळ करताना आणि विचार सांगताना जत्रा यात्रा भरवून भागणार नाही तर लाखोंच्या संख्येने स्वंयस्फुर्ती ने एकत्र आलेल्या लोकांचे सामाजिक प्रबोधन होणे गरजचे आहे, सामाजिक व वैचारिक कार्याची समिक्षा करून येणाऱ्या काळात कोणकोणत्या गोष्टींवर काम करायचे याचे नियोजन करणे आवश्यक आहे. एक जानेवारी आली म्हणून चाललो कोरेगाव ला, चौदा जानेवारी आली म्हणून चाललो औरंगाबाद ला, विजया दशमी आहे म्हणून चाललो नागपूरला, सहा डिसेंबर आहे म्हणून चाललो मुंबई ला केवळ आल्या केल्याने परिवर्तन होणार नाही तर जायचे कशाला हा प्रश्न आणि त्या प्रश्नाचे उत्तर मिळाले तरच वरिल ठिकाणी जाण्यात आनंद आहे. आपण आजही आपल्या ऐतिहासिक स्थळाबद्दल जागृत व गंभीर नाही आहोत. याचे उदाहरण म्हणजे नागपूर ला दरवर्षी जाऊनही घरातील अंधविश्वास कमी होत नाही, औरंगाबाद ला दरवर्षी जाऊन ही नामांतर लढ्यातुन एकीची शिकवण घेत नाहीत, भिमाकोरेगाव ला जाऊन ही शौर्य व अन्यायाची जाणीव होत नाही, दरवर्षी घराघरात भिमजंयती साजरी होऊनही भिमाचे विचार डोक्यात जात नाही हे कटूसत्य कोणीही नाकारू शकत नाही. भिमाकोरेगाव जयस्तंभ आणि जयस्तंभाच्या देखभालीसाठी जी जागा दिली होती त्या जागेवर अतिक्रमण केले गेले आहे. जयस्तंभची जागाच आज धोक्यात आली आहे. जर जयस्तंभ सुरक्षित नसेल आणि त्याची माहिती आपल्याला नसेल तर आपण कोरेगाव ला जाऊन साध्य तरी काय करतो. एक जानेवारी ला कोरेगाव जयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी न्यायालयाची परवानगी घ्यावी लागते याबाबत किती लोक जागृत आहेत. भिमा कोरेगाव जयस्तंभाला अतिक्रमाणाच्या विखळ्यातुन काढण्यासाठी न्यायालयीन लढा लढणे आवश्यक आहे. मागील अनेक वर्षांपासून भिमाकोरेगाव जयस्तंभाची न्यायालयीन लढाई दादाभाऊ अभंग हे एकटेच लढत आहेत. न्यायालयीन बाजु लढायची तर पैसा वेळ खर्च करावा लागतो. एवढे करूनही निकाल काय लागेल याची शाश्र्वती नसते. भिमा कोरेगाव जयस्तंभ हा समाज्याच्या अस्मितेचे आणि अस्तित्वाचे प्रतिक आहे, दरवर्षी लाखों लोक जयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी जातात. परंतु याच स्तंभाच्या संवर्धनासाठी कीती लोक समोर येतात हा प्रश्नच आहे. सामाजिक लढा एकट्याने लढायला खुप अडचणी येतात. सामाजिक लढा लढायला समाजाची मदत झाली तर लढायला ताकद आणि सकारात्मक उर्जा मिळते. परंतु कित्येक वर्षांपासून दादाभाऊ अभंग हे एकहाती एकटेच हि बाजु सांभाळून न्यायालयीन लढा तिव्र करत आहेत. अनेक वेळा वेगवेगळ्या माध्यमातून समाजाच्या मदतीसाठी त्यांनी आव्हाहन ही केले आहे. परंतु आपल्याला त्या बाबींचे गांभीर्य नसल्याने जास्त कोणी मनावर घेत नाही. परंतु आता वेळ आली आहे कोरेगाव भिमाच्या संरक्षणासाठी एकत्र येऊन सामाजिक लढा उभा करण्याची. दादाभाऊ अभंग यांना सर्वोतोपरी मदत करून हा न्यायालयीन लढा जिंकण्याची. एकटे दादाभाऊ अभंग हे हा लढा मोठ्या नेटाने लढत आहेत परंतु आपल्याला त्यांच्या सोबत उभे राहून सामाजिक, आर्थिक ताकद लावणे गरजेचे आहे. कारण कोरेगाव भिमाचा जयस्तंभा विषयी खुप मोठे काम करणे खुपच गरजेचे आहे. न्यायालयाचा निकाल आला तर त्याचे संवर्धन व सुशोभीकरण करावे लागेल, निकाल नाही आला तर पुन्हा आव्हान करून वरच्या न्यायालयात जावे लागेल. कोर्ट कचेरीचा खर्च, कोरेगाव भिमा विषयी जनजागृती करून जन समर्थन मिळवण्यासाठी लागणारा खर्च खुप आहे. कोणताही एकटा व्यक्ती हा खर्च करु शकत नाही. आणि एकट्या व्यक्तीनेच हे सर्व का करावे? म्हणून गावागावात प्रबोधन होऊन पैसा वेळ व बुद्धी देऊन आपल्या जयस्तंभाचे संवर्धन करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक गावात एक टीम बनवून कोरेगाव भिमाच्या स्तंभाच्या समस्येचे गांभीर्य लोकांना माहिती करून देऊन सर्वांनी हातात हात घेऊन काम करणे आज गरजेचे आहे. फक्त गप्पा मारून आणि सोशलमिडीयावर राहून आपल्याला लढा जिंकता येणार नाही त्यासाठी रस्त्यावर उतरावेच लागेल. रस्त्यावर उतरायचे तर पैसा वेळ आणि बुद्धी सर्व काही मजबूत पाहिजे म्हणून सर्वांना नाचगाणे आणि मनोरंजन यावरचा खर्च टाळून कोरेगाव भिमाच्या जयस्तंभासाठी देणे आवश्यक आहे. जयस्तंभच नाही तर लेण्याचे दैविकरण करणे सुरू आहे. अनेक जुन्या मंदिरात बुद्ध मुर्त्या आढळून आल्या आहेत या ही वास्तू आपल्याला जर आपल्या ताब्यात घ्यायचे असेल तर आपल्याला सर्व शक्तीने उभे राहणे आवश्यक आहे. कोरेगाव भिमाच्या जयस्तंभाला वंदन करण्यासाठी दरवर्षी लाखों लोक जातात, लेण्यावर दररोज हजारो लोक जातात तरीही जयस्तंभ आणि लेण्यावर काही लोक अतिक्रमण करू पाहत आहेत याचे कारण आहे लेण्या, जयस्तंभ यांच्या विरोधात जो जाईल, लेण्याचे दैविकरण जो करेल त्याच्या मागे एक आर्थिक शक्ती, एक मानवी ताकद उभी असते. आमच्या च पुर्वजांच्या शौर्याचा जयस्तंभ, आमच्या च बुद्धाच्या लेण्या यावर अतिक्रमण केले जाते तरीही आम्हाला त्याचे काहीच वाटत नाही कारण एक आम्ही कधी आमचे ऐतिहासिक स्थळांचे महत्व कधी समजून घेतले नाही, त्याबद्दल गंभीर कधी झालो नाही. आपली बाजु सत्य असुनही कोणी बोलायची हिंमत करत करू शकत नाही कारण त्याच्या मागे आवश्यक असणारी आर्थिक व सामाजिक शक्ती नसते. म्हणून आम्ही जेथेही लाखोंच्या संख्येने जातो ते फक्त एक दिवस डोक्यात त्या जागे बद्दल, स्थळाबद्दल उर्जा असते. बाकी तेथून घरी आलो की सर्व काही विसरून जातो. फक्त गर्दी करून आणि जत्रा यात्रेचे स्वरूप बनवून प्रश्र्न सुटणार नाही, न्याय मिळणार नाही. अनेक जन बुद्ध मुर्तीलाच देव म्हणून पुजले जाते याचे व्हिडीओ सोशलमिडीयावर शेअर करतात. पण ते बुद्ध मुर्ती आपल्या ताब्यात घेण्यासाठी काय करावे यासाठी किती लोक प्रयत्न करतात? लेण्यांवर दैविकरण केले जात आहे हे थांबण्यासाठी कोणाकडे काय नियोजन आहे? असे अनेक प्रश्र्न आहेत यावर एकच उत्तर आहे ते म्हणजे सर्वांनी एकत्र येऊन एकमताने, पैसा, वेळ व बुद्धी खर्च केली तरच आपण आपले ऐतिहासिक वारसा स्थळे सुरक्षित ठेऊ शकु. नाहीतर भविष्यात आपले वारसा स्थळे भावी पिढी पाहू शकणार नाही. कोरेगाव भिमा च्या जयस्तंभासाठी आपण सर्वांनी दादाभाऊ अभंग यांच्या लढ्याला साथ सहयोग करून त्यांना लढा लढण्यासाठी बळ दिले आणि कोरेगाव भिमाच्या प्रश्र्नाविषयी जनजागृती केली तर कोरेगाव भिमा च्या लढ्यासह आपण इतरही लढे यशस्वी लढू शकू याची प्रेरणाही मिळेल. बौद्धांचे ऐतिहासिक वारसा स्थळे संकटात असताना आम्ही केवळ एकच दिवस गोंधळ घालून, नाचगाणे आणि मनोरंजन यावर खर्च करून काहीच साध्य होणार नाही. नाचगाणे व मनोरंजन बंद करून, समाजाचे प्रबोधन करून न्याय हक्क व वारसा स्थळांचे जतन व संवर्धन करण्याची उर्जा प्रत्येकात निर्माण झाली पाहिजे. म्हणून प्रत्येकाने होईल त्या प्रमाणात मदत करून कोरेगाव भिमाचा जयस्तंभ न्याय व संवर्धनासाठी प्रयत्न करावे. जयस्तंभ न्यायालयीन लढा लढणारे दादाभाऊ अभंग यांचा संपर्क क्रमांक: ९७०२८४५०००

**विनोद पंजाबराव सदावर्ते, मोबा ९१३०९७९३००**

पान १ वरुन

## राहुल नार्वेकरांच्या निकालाविरोधात

राहुल नार्वेकरांनी २०१९ सालची शिवसेनेची घटनादुरुस्ती अवैध ठरवून उद्धव ठाकरेंचं पक्षप्रमुख पदही अमान्य केलं. तसंच, १९९९ ची पक्षघटना आणि बहुमताच्या आधारे शिंदे गटच खरी शिवसेना असल्याचं मान्य केलं.

शिंदे गटाला खऱ्या शिवसेनेची मान्यता देताना राहुल नार्वेकरांनी शिंदे गटातील १६ आमदार पात्र ठरवले. तसंच, ठाकरे गटाच्याही १४ आमदारांनाही पात्र ठरवले आहे.

ठाकरे गटाने शिंदे गटाच्या १६ आमदारांना अपात्र ठरवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका केली होती. परंतु, हे प्रकरण राहुल नार्वेकरांकडे गेल्यानंतर त्यांनी शिंदे गटातील १६ आमदारांना पात्र ठरवले गेले. त्यामुळे राहुल नार्वेकरांच्या या निकालाविरोधात ठाकरे गटाने आता पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले आहे. हे प्रकरण राहुल नार्वेकरांकडे सुपूर्द करतानाच सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलं होतं की, राहुल नार्वेकरांच्या निकालातून न्याय मिळाला नसल्याचं जाणवल्यास याचिकाकर्ते पुन्हा सर्वोच्च न्यायालयात दाद मागू शकतात. त्यानुसार, उद्धव ठाकरे गटाने पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

## आंध्र प्रदेश काँग्रेसमध्ये मोठी

प्रवेश केला होता.

वाय. एस. शर्मिला यांनी १० दिवसांपूर्वी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि वायनाडचे (केरळ) खासदार राहुल गांधी, काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणूगोपाल यांच्या उपस्थितीत काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला होता. याआधी त्यांनी तेलंगणाच्या विधानसभा निवडणुकीत स्वत:च्या पक्षाचे उमेदवार उभे न करता काँग्रेसला पाठिंबा दिला होता. त्यानंतर त्यांनी थेट काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. काँग्रेस हायकमांड आता शर्मिला यांच्याकडे आंध्र प्रदेश काँग्रेसची जबाबदारी सोपवू शकतं. शर्मिला या आंध्र प्रदेशचे दिवंगत नेते तथा माजी मुख्यमंत्री वाय. एस. राजशेखर रेड्डी यांच्या कन्या आहेत.

शर्मिला यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यापासूनच त्यांना पक्षाचं प्रदेशाध्यक्षपद दिलं जाईल, असं बोललं जात होतं. दरम्यान, विद्यमान अध्यक्ष गिडुगू रुद्र राजू यांनी प्रदेशाध्यक्षपद सोडलं आहे. काँग्रेस पक्षप्रवेशाच्या वेळी शर्मिला म्हणाल्या होत्या की, पक्ष त्यांना जी जबाबदारी देईल ती पेलण्यास त्या समर्थ आहेत. शर्मिला म्हणाल्या होत्या, मी पक्षात कोणतीही जबाबदारी स्वीकारण्यास तयार आहे. केवळ आंध्र प्रदेशच नव्हे तर आंदमानमध्येही मी पक्षाची जबाबदारी घेण्यास तयार आहे.वाय. एस. शर्मिला यांनी २०१९ च्या आंध्र प्रदेश विधानसभा निवडणुकीत वायएसआर काँग्रेसचा जोरदार प्रचार केला होता. त्या निवडणुकीत पक्षाने विजय मिळवला आणि जगनमोहन रेड्डी हे मुख्यमंत्री झाले. परंतु, गेल्या काही वर्षांमध्ये पक्षाने हळूहळू शर्मिला यांना बाजूला केलं. त्यामुळे शर्मिला यांनी पक्षाला रामराम करत काँग्रेसची वाट धरली.

## राज्यातील धार्मिक स्थळांच्या,..

आठवडाभरात हा बदल दिसायला हवा. तसेच धार्मिक स्थळांवर कायमस्वरुपी स्वच्छता राखण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून विशेष योजना तयार करण्याच्या आणि या योजनेला जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करण्याच्या सूचना दिल्या. या योजनेसाठी महसूल विभागाच्या माध्यमातून नोडल अधिकारी नेमून राज्यस्तरावरुन लक्ष ठेवावे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, आपल्या राज्याला स्वच्छता अभियानात देशात पहिला क्रमांक मिळाला आहे. हा क्रमांक आपल्या राज्याला कायम ठेवायचा आहे. यात डीप क्लिन मोहिम महत्वाची ठरणार आहे. राज्यातील शहरी भागात डीप क्लिनिंग मोहिम आपण राबवत आहोत. या मोहिमेद्वारे एकाच वेळी जादा मनुष्यबळ आणि संसाधने वापरून स्वच्छता करण्यात येत आहे. यामुळे प्रदूषणासोबतच रोगराई सुद्धा कमी होत असून या मोहिमेला जनतेचा चांगला प्रतिसाद लाभत आहे. तसेच यासाठी नगरविकास विभागातर्फे नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करुन लक्ष ठेवण्यात येणार आहे. डीप क्लिन अभियानात सफाई कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान आहे. त्यांना प्रोत्साहन द्यायला हवे तेव्हा त्यांच्याकडून अधिक चांगले काम होणार आहे, या मोहिमेचे ते खरे हिरो ठरले आहेत.

तसेच राज्यात ही स्वच्छता केवळ शहरी भागापूरती मर्यादित राहायला नको. यासाठी शहराच्या हद्दीलगत तसेच ग्रामीण भागात देखील स्वच्छता मोहिम राबविण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले. या भागांच्या स्वच्छतेसाठी देखील कायमस्वरुपी योजना राबविण्याचे आणि जिल्हा नियोजन समिती माध्यमातून निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. त्याचप्रमाणे राज्याच्या किनारपट्टी भागातील जिल्ह्यांना किनारा स्वच्छतेसाठी १४ युनिट उपलब्ध तातडीने करुन देण्यात,असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. यावेळी मुंबई महानगरपालिकेचे अतिरीक्त आयुक्त सुधाकर शिंदे यांनी डीप क्लिन मोहिमेविषयी थोडक्यात माहिती दिली.

याबाबत बोलतांना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, राज्यातील महिलांच्या सबलीकरणासाठी महिला सशक्तीकरण अभियान राबविण्यात येत आहे. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांना बाजारातील मागणी असणाऱ्या वस्तुंच्या निर्मितीचे प्रशिक्षण देणे, भांडवल उपलब्ध करणे आणि त्या वस्तुंचे ब्रांडिंग, मार्केटिंग करणे यासाठी मदत करण्यात येणार आहे. तसेच बचत गटांना त्यांच्या मालाची विक्री करता यावी याकरिता जिल्हा प्रशासनाद्वारे तात्पुरते स्टॉल उपलब्ध करुन द्यावेत. राज्यातील बस स्थानक, रेल्वे स्थानक आणि मॉल्स मध्ये काही स्टॉल तातडीने बचत गटांना कसे उपलब्ध करुन देता येतील, याचे नियोजन करावे. दीर्घकालीन उपाययोजना म्हणून रत्नागिरी जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या बचत गट मॉल ही संकल्पना सुद्धा इतर जिल्ह्यात राबवावी. या अभियानातून जास्तीत जास्त महिलांना बचत गटांच्या चळवळीत सहभागी करुन घ्यायचे आहे. राज्यातील बचत गट मेहनत करणारे असून त्यांना मजबूत करण्यासाठी शासन म्हणून प्रभावी पाऊले आपल्याला उचलायची आहेत, असेही त्यांनी सांगितले.

राज्यातील सर्व शाळांमध्ये १ जानेवारी पासून राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानाचा आढावा मुख्यमंत्र्यांनी घेतला. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी. शाळेकडे ओढा वाढावा. शिक्षक, पालक, विद्यार्थी यांच्यात शाळेबद्दल आत्मियता वाढावी, याकरिता हे अभियान महत्वाचे आहे. अभियानातील माझी परसबाग उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये शेतीविषयक आवड निर्माण होईल. स्वच्छता मॉनिटर टप्पा-२ मोहिमेतून स्वच्छतेचे महत्व पोहचणार आहे. महावाचन महोत्सवातून वाचनाची आवड निर्माण होणार आहे. या अभियानात २ कोटी विद्यार्थी सहभागी होणार असून प्रोत्साहन देण्यासाठी ७० कोटी रुपयांची पारितोषिक देण्यात येणार आहे. तसेच शाळांच्या सक्षमीकरणासाठी उद्योगांच्या सामाजिक दायित्व निधीच्या माध्यमातून दत्तक शाळा, डिजिटल क्लासरुम, सायकल वाटप असे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. हे अभियान यशस्वी करण्यासाठी शिक्षण क्षेत्रात चांगले काम केलेल्या जिल्ह्यांचा अभ्यास करावा, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

या बैठकीत मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानाबाबत मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी अमित हुक्केरीकर यांनी सादरीकरण केले.

## सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या

आपल्या जबाबदारी विषयी माहिती घेऊन त्या पद्धतीने व्यवस्थितपणे कामकाज करावे. पोलीस विभागाने सर्व मतदान केंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्याच्या दृष्टीने नियोजन करावे तसेच क्रिटिकल मतदान केंद्राबाबत अधिक काळजी घ्यावी, असे त्यांनी सुचित केले.

निवडणूक विभागाने जिल्ह्यातील सर्व सेक्टरच्या याद्या पोलीस विभागाला उपलब्ध करून द्याव्यात. त्यानुसार लवकरच सर्व सेक्टर अधिकाऱ्यांच्या नियुक्ती पोलीस विभागाकडून करण्यात येतील अशी माहिती पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी दिली. निवडणूक कालावधीत सर्व मतदान केंद्रावर तसेच दोन्ही लोकसभा मतदारसंघात पोलीस विभागाच्या वतीने कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पुरेशा प्रमाणात बंदोबस्त ठेवण्यात येईल असे सांगून सर्व विभागात चांगले सहकार्य राहील, असे त्यांनी अपेक्षा व्यक्त केली.

सर्व नोडल ऑफिसर यांनी त्यांना दिलेली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडावी. निवडणूक कामकाज करत असताना विषय समजून शांतेत काम करावे. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे काम केल्यास कोणतीही अडचण येणार नाही, असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी सर्व नोडल अधिकारी यांच्या कामाचा सविस्तर आढावा घेऊन संबंधितांना मार्गदर्शक सूचना दिल्या. प्रारंभी उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निराळी यांनी जिल्ह्यात एकूण ११ विधानसभा मतदारसंघ असून लोकसभेचे सोलापूर व माढा हे दोन लोकसभा मतदारसंघ आहेत. तर बार्शी विधानसभा मतदारसंघ शेजारील धाराशिव लोकसभा मतदारसंघाला जोडलेला आहे, त्याचप्रमाणे माढा लोकसभा मतदारसंघात मान व फलटण या शेजारील जिल्हयातील विधानसभा मतदारसंघाचा समावेश असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच जिल्ह्यातील ३५९९ मतदान केंद्र असून मतदाराची एकूण संख्या ३५ लाख ७८ हजार ६३३ इतकी आहे. १ हजार २४४ मतदान केंद्र महापालिका व नगरपालिका हद्दीत येतात तर २ हजार ३५५ मतदान केंद्र हे ग्रामीण भागात असल्याचे त्यांनी सांगितले.

## एकाच दिवशी देशाचे दोन मोठे नेते ..

१९ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता शरद पवार हे सांगोल्यात पोहचतील. तसेच या कार्यक्रमासाठी सुशीलकुमार शिंदे , विजयसिंह मोहिते पाटील आणि शेकाप नेते आ जयंत पाटील यांची उपस्थिती असणार आहे .या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी अजित पवार गट , शिवसेना शिंदे गट आणि भाजप च्या अनेक आजीमाजी आमदारांनाही निमंत्रण करण्यात आलंय.

यामध्ये पवारांवर कायम टोकाची टीका करणारे भाजप खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर , आमदार गोपीचंद पडळकर , आमदार जयकुमार गोरे , आमदार समाधान अवताडे असणार आहेत . याशिवाय सांगोल्याचे आमदार शहाजीबापू पाटील , आमदार राम सातपुते , आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांची उपस्थिती आहे .पवारांचे जुने सहकारी आणि अजित पवार गटाचे आमदार बबनदादा, संजयमामा शिंदे , दीपक साळुंखे अशी दिग्गजांची उपस्थित असणार असल्याची माहिती देण्यात येतेय. या सत्ताधाऱ्यांना उत्तर देण्यासाठी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार आणि काँग्रेसच्या आमदार प्रणिती शिंदे यांची उपस्थिती असणार आहे .

## पंतप्रधान नरेंद्र मोदी

२०२४ मध्ये देशात परत एकदा नरेंद्र मोदींच पंतप्रधान होतील. त्यामुळे देशात काँग्रेस आणि इतर विरोधी पक्ष मिळून समाजात गैरसमज पसरवीत आहे. संविधानाला अनुरूप कार्य मोदी सरकारने केले असून काँग्रेसने फक्त दलितांचे मते घेण्याचे काम केले आहे. देशाचे संविधान बदलणे कधीही शक्य नाही. ही निव्वळ अफवा असल्याचे आठवले म्हणाले.

यावेळी रामदास आठवले यांना अकोल्याची जागा तुम्ही मागणार का? असा प्रश्र्न विचारला असता, तेव्हा अकोल्याची जागा आम्ही प्रकाश आंबेडकरांसाठी सोडली, असं मोठं वक्तव्य त्यांनी केल. तसेच, प्रकाश आंबेडकरांना आम्हाला पाठिंबा दिल्यास, आम्हीही त्यांना पाठिंबा देऊ, असंही रामदास आठवले म्हणाले आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

दैनिक
यश सिद्धि न्यूज
मंगळवार दि.१६ जानेवारी २०२४


## स्वामी भक्तांना सोयी-सुविधा पुरविण्यासाठी न्यासाचे कार्य कौतकास्पद : हणमंतराव गायकवाड



अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांचे पुत्र प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली स्वामी भक्तांना सोयी-सुविधा पुरविण्यासाठी न्यास हे अग्रगण्य असून परिसरातील स्वछता, शांतता, शिस्त, उत्साही वातावरण असल्याचे मनोगत बी.व्ही.जी.ग्रुपचे चेअरमन हणमंतराव गायकवाड यांनी व्यक्त केले.ते श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजें भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्तीं, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.यावेळी न्यासाचे सचिव मोरे माजी उपनगराध्यक्ष दिलीपभाऊ सिद्धे, बाळासाहेब मोरे,,एस.के.स्वामी, सिद्धराम कल्याणी, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, धानप्पा उमदी, बाळासाहेब घाडगे, अभियंता अमित थोरात, , महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे, कल्याण देशमुख, शावरप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुर यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## तालुका पशुसंवर्धन अधिकारी डॉ. दिनेश मुरुमकर यांचे यश सिध्दी न्यूज परिवारातर्फे सत्कार



अक्कलकोट/ प्रतिनिधी : अक्कलकोट पंचायत समिती येथील तालुका पशुसंवर्धन अधिकारी डॉ. दिनेश मुरूमकर यांचे सत्कार यश सिद्धी न्युज दुधनी परिवार कडून करण्यात आले

दुधनी भीमनगर येथे पत्रकार निंगप्पा निंबाळ यांचे घरी अक्कलकोट तालुका पशुसंवर्धन अधिकारी डॉ दिनेश मुरूमकर सदिच्छा भेट दिले. यावेळी त्याचे यश सिद्धी न्युज दिवाळी अंक भेट देऊन विशेष सत्कार करण्यात आले. यावेळी निंगप्पा निंबाळ, प्रीतम निंबाळ, शशिकला निंबाळ, सोमनिंग निंबाळ , लक्ष्मीबाई निंबाळ ,पुरुषोत्तम निंबाळ, शोभा निंबाळ, प्रणाम निंबाळ, प्रथम निंबाळ, प्रगती निंबाळ , आणि यश सिद्धी न्युज परिवार व आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## आमदार समाधान आवताडे यांच्यावतीने पत्रकार बांधवांचा सन्मान

पंढरपूर/प्रतिनिधी:पत्रकार हा समाजाबरोबरच लोकप्रतिनिधींचा आरसा असतो समाजात घडणाऱ्या वेद घटना पत्रकार सातत्याने समोर आणतो याचबरोबर लोकप्रतिनिधींचे विविध प्रश्र्नाकडे लक्ष वेधून घेण्याची काम सातत्याने करत असतो




या दरम्यान अनेक घटकाशी सामना पत्रकारांना करावा लागतो मात्र पत्रकारांचे मूलभूत प्रश्र्न कायम आहेत पंढरपूर येथील पत्रकारांचा घरकुलाचा प्रश्र्न सातत्याने मांडला जात आहे काही दिवसात बैठक घेऊन हा प्रश्र्न सोडवण्याचा प्रयत्न करणार असल्याचा विश्र्वास पत्रकारांना आमदार अवताडे यांनी दिला

आमदार समाधान आवताडे यांच्या वतीने पंढरपूर येथील पत्रकारांचा येतोचित सलमान कार्यक्रमाचे पत्रकार भवन येथे करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार विलास उत्पाद हे होतेयाप्रसंगी व्यासपीठावर ज्येष्ठ पत्रकार सिद्धार्थ ढवळे भाजप जिल्हा उपाध्यक्ष विजय देशमुख माजी नगरसेवक सुनील डोंबे तुकाराम कुरे विनोद लटके समाधान घायाळ प्रसाद कळसे उपस्थित होते

पुढे बोलताना आमदार समाधान आवताडे म्हणाले की पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाच्या विकासासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे पुढील काळात पंढरपूरच्या विकासासाठी मोठा निधी मिळणार आहे यातून दर्जेदार कामे कशी करता येतील याकडे लक्ष घालणार असल्याचे आमदार समाधान आवताडे यांनी सांगितले

यावेळी पत्रकारांनी पंढरपुरातील विविध विकास कामाबाबत तसेच विठ्ठल मंदिराच्या कारभारा प्रश्र्न उपस्थित केला यावर आमदार समाधान आवताडे यांनी आपण यामध्ये लक्ष घालणार असल्याचा विश्र्वास दिला मतदार समितीवर सदस्य म्हणून पत्रकार प्रतिनिधी घ्यावा यासाठी प्रयत्न करणार असलेले यावेळी आवर्जून सांगितले

सुरुवातीला आमदार समाधान आवताडे यांनी पत्रकार दिनाच्या व मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या यानंतर पत्रकारांचा येतोचित सन्मान करून पेन शाल आणि पंढरपूरचे पत्रकार श्रीकांत साबळे यांनी लिहिलेले संघर्ष यात्री हे पुस्तक भेट दिली




## आर पी कॉलेज धाराशिव येथे नामविस्तार दिन मोठया उत्साहात साजरा

धाराशिव: सुधाकर रणदिवे, विश्र्वरत्न डॉ,बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन हा मोठ्या संख्येने आर पी कॉलेज धाराशिव येथे साजरा करण्यात आला. यावेळेस आयोजक सर्व भीमसैनिक रामकृष्ण महाविद्यालय धाराशिव यांनी आयोजित केला होता. या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला.

## मंगल परिणय हा आयुष्यातील आनंदाचा क्षण : डॉ चव्हाण

पुणे: मंगल परिणय हा आयुष्यातील जोडीदार निवडचा आनंदाचा क्षण असुन सर्वच क्षेत्रात आपले आदर्श भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर हे असून आज मुले पदवीधर , आयटी, कॅम्पुटर क्षेत्रातील शिक्षणाकडे वळत आहेत विद्यापीठ व अन्य क्षेत्रात शिकल्यामुळे ते शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या सक्षम असून त्यांना मंगल परिणयाकरीता जोडीदार निवडणे त्यासाठी पालकांचे सहकार्य तर आहेच परतू जबरदस्ती नसावी असे मत बार्टीचे विभागप्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण यांनी बोलताना व्यक्त केले. सम्राट सामाजिक प्रतिष्ठान यांच्या वतीने १४ जानेवारी रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन, मालधक्का पुणे येथे बौद्ध वधू वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला होता .कोरेगाव भीमा विजयस्तंभ शौर्य दिन सोहळा यशस्वी होण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान




दिल्याबद्दल बार्टी संस्थेचे विभागप्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण यांचा आयोजक प्रभाकर कांबळे यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा, शाल पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ चव्हाण म्हणाले की शिक्षण घेण्यामुळे वय वाढत जाते सर्वच क्षेत्रातील उमेदवारांनी योग्य निर्णय घेऊन आपली दिशा ठरवावी बौद्धामध्ये साक्षरतेचे प्रमाण ७५ टक्के पेक्षा अधिक असून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याचा संपूर्ण जगच आज गौरव करत असुन युनोत सुद्धा जयभीमचा जयघोष होत आहे . बार्टी ही देशातील अत्यंत अग्रगण्य व महाराष्ट्र शासनाची महत्त्वपूर्ण संस्था आहे बार्टीने अनेक आधिकारी घडवले असून बार्टीच्या वतिने विद्यार्थ्यांसाठी पीएचडी एमपीएससी यूपीएससी आयबीपीएस चे प्रशिक्षण देण्यात येते यांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आव्हान त्यांनी यावेळी केले.

डॉ प्रेम हनवते मनोगत व्यक्त करताना म्हणाले की विभागप्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण यांनी कोरेगाव भिमा विजयस्तंभ शौर्य दिन यशस्वी होण्यासाठी नियोजनात महत्वपूर्ण भूमिका घेऊन शौर्य दिन यशस्वी केला त्याबद्दल त्यांचा सन्मान होत आहे याचा आम्हाला अभिमान असल्याचे सांगून वधू वर मेळाव्यास शुभेच्छा दिल्या . याप्रसंगी सम्राट सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष आयोजक प्रभाकर कांबळे, बार्टीचे प्रकल्प व्यवस्थापक डॉ प्रेम हनवते, विकास गायकवाड, सुनंदाताई गायकवाड, रामदास लोखंडे, विनायक भालेराव, प्रदिप भालेराव, शंकर माने आदी विचारपिठावर उपस्थित होते.

मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.या मेळाव्यास इच्छुक वधू वर पालक यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सुत्रसंचलन प्रसिद्ध निवेदक दिपक मस्के यांनी केले. आभार विकास गायकवाड यांनी मानले.

## महाराष्ट्र बहुजन मध्यवर्ती शिवजन्मोत्सव अध्यक्षपदी बाळासाहेब पोळ, उपाध्यक्षपदी विजय माने

अक्कलकोट/प्रतिनिधीः महाराष्ट्र बहुजन मध्यवर्ती शिवजन्मोत्सव युवक मंडळाने श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष व मंडळाचे आधारस्तंभ जन्मेजयराजे भोसले, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, सुरेशचंद्र सुर्यवंशी, बाबासाहेब निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली शिवजन्मोत्सवच्या पदाधिकाऱ्यांची निवडी संपन्न झाल्या. अध्यक्षपदी - बाळासाहेब पोळ, उपाध्यक्षपदी - विजय उर्फ गोटू माने यांची एक मताने निवड करण्यात आली.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ आणि महाराष्ट्र बहुजन मध्यवर्ती शिवजन्मोत्सव युवक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सालाबादप्रमाणे शिवजयंती मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात येते. यंदा देखील जय्यत तयारी सुरु झाली आहे. याकरिता सोमवारी राजे फत्तेसिंह चौक, सर्जेराव जाधव पथ या मार्गावरील श्री फत्तेसिंह शिक्षण संस्थेच्या सर्जेराव जाधव सभागृहात आयोजित केलेल्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मावळते अध्यक्ष निखील पाटील हे होते.



सदर पदाधिकारी निवड ही सोलापूर सकल मराठा समाजाचे राज्य समन्वयक माऊली पवार, प्रा.गणेश देशमुख, रवी मोहिते, अनंतनेता जाधव, अँड. श्रीरंग लाळे, जेष्ठ नेते सुरेशचंद्र सूर्यवंशी, शिवाजीराव पाटील, अमोलराजे भोसले, महेश इंगळे, बाबासाहेब निंबाळकर, तम्मा शेळके, प्रकाश पडवळकर, बाळासाहेब मोरे, अमर शिंदे, सुभाष गडसिंग, सुधाकर गोंडाळ, अरुण साळुंखे, मोहनराव चव्हाण, पिंटू सोनटक्के आदिजनांच्या उपस्थित संपन्न झाली. नूतन अध्यक्षपदी बाळासाहेब पोळ व उपाध्यक्षपदी विजय उर्फ गोटू माने यांची एकमताने निवड झाल्याबद्दल उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सदर प्रतिष्ठापना जुना राजवाडा समोरील शामियाना मंडपात मिरवणूकीने छत्रपती शिवरायांच्या सिंहारुढ पुतळ्याची प्रतिष्ठापना करण्यात येणार असल्याची माहिती नूतन अध्यक्ष बाळासाहेब पोळ व उपाध्यक्ष विजय उर्फ गोटू माने यांनी सांगितले.

यावेळी मनोज निकम, वैभव नवले, बालाजी जाधव, प्रशांत भगरे, अतुल जाधव, निखील पाटील, शीतल जाधव, बाळासाहेब पोळ, गोटू माने, राजेंद्र सूर्यवंशी, वरून शेळके, विजय पाटील, रवी कदम, बालाजी पाटील, महेश दनके, अतिश पवार, माणिकराव बिराजदार, दयानंद काजळे, रणजीत गोंडाळ, सागर गोंडाळ, रोहित खोबरे, मनोज इंगोले, श्रीकांत झिपरे, योगेश पवार, केदार तोडकर, विशाल कलबुर्गी, फहीम पिरजादे, सनी सोनटक्के, गोविंदराव शिंदे, स्वामीराव मोरे, भरत राजेगावकर, विकी गडदे, पिंटू साठे, राजू शिंदे, प्रदीप सुरवसे, प्रथमेश पवार, वैभव मोरे, अरुण टोणपे, विजय इंगळे, माणिकराव पवार, शुभम कामळूरकर, यशवंतराव भोसले, अनाद पवार, राहुल शेळके, सुभाष सुरवसे, आकाश शिंदे, प्रसाद मोरे, महेश भोसले, नितीन शिंदे, चंद्रशेकर वाकडे, मुन्ना कोल्हे, रोहित निंबाळकर, ऋषिकेश चव्हाण, गणेश पाटील, रमेश शिंदे, आबा सूर्यवंशी,आकाश सूर्यवंशी यांच्यासह तालुक्यातील सकल मराठा समाज बांधव उपस्थित होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन, आभार प्रा.प्रकाश सुरवसे यांनी मानले.

## वसंतराव देशमुख यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त कासेगावात भव्य नागरी सत्कार सोहळा

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर तालुक्यातील काशिगाव येथील सुपुत्र कासेगाव जिल्हा परिषद सदस्य तथा पांडुरंग सहकारी साखर कारखान्याची संचालक वसंत (नाना) देशमुख भव्य नागरी सत्कार सोहळा समितीच्या वतीने देण्यात आली कासेगाव जिल्हा परिषद गटात कायम आपला राजकीय धबधबा असलेली व्यक्तिगत म्हणून जनसामान्यात ओळख असणारे अशी वसंत (नाना) देशमुख यांचे आजपर्यंत राजकीय कारकीर्दीची ओळख आहे त्यांच्या चांगल्या कर्तुत्वाने कासेगाव ग्रामपंचायत व जिल्हा परिषद गटातील मित्रपरिवार यांच्या वतीने ६१ व्या वाढदिवसाचे भव्य नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन केले आहे



गुरुवार दि १८ रोजी सायंकाळी पाच वाजता काशिगाव येथील दौलतराव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय कार्यस्थळावर हा भव्य नागरिक सत्कार सोहळा संपन्न होणार आहे कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या शुभहस्ते होणार आहे तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध कायदेतज्ञ सरकारी वकील उज्वल निकम साहेब हे असणार आहेत प्रमुख पाहुणे म्हणून सांगलीचे खासदार संजय काका पाटील सोलापूर खासदार जय सिद्धेश्र्वर स्वामी आमदार विजयकुमार देशमुख विधान परिषदेचे सदस्य रंजीत सिंह मोहिते पाटील माजी आमदार प्रशांत परिचारक आमदार राजन पाटील सांगोल्याचे शिंदे घाटाचे आमदार शहाजी पाटील पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे मोहोळचे आमदार यशवंत माने आटपाडीचे माजी आमदार राजेंद्र अण्णा देशमुख माजी आमदार दिलीप माने, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष बळीराम काका साठे पुणे महसुलायुक्त प्रभाकर देशमुख सांगली जिल्हा परिषद माजी अध्यक्ष अमरसिंह देशमुख शिवसेनेचे नेते शिवाजी सावंत इत्यादी मान्यवर उपस्थित राहणार आहेत

तरी पंढरपूर शहर व तालुक्यातील सभासद शेतकरी नागरिक कामगार यांनी मोठ्या संख्येने कार्यक्रमास काशिगाव येथे उपस्थित राहण्याचे आवाहन सत्कारमूर्ती वसंत नाना देशमुख भव्य नागरी सत्कार सोहळा समितीच्या वतीने करण्यात आले आहे

## रक्तदान शिबिरात २५४ जनाने केले रक्तदान ; ७४ वा आर्मी डे साजरा

मुंबई : थळसेना दिन कोंकण भवन सीबीडी बेलापूर येथे आज खूप हर्ष उत्साहात १५ जानेवारी ला अमर ज्योती स्तंभाला मानवंदना देऊन कार्यक्रमास सुरूवात करण्यात आला.

कोकण भवन प्रांगण, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई, प्रमुख आकर्षण : आर्मी स्टेशन मुख्यालय, कुलाबा मुंबई यांच्या वतीने 'शस्त्र प्रदर्शन'. आसाम रेजिमेंट कडून प्रदर्शित करण्यात आले आहे.

यावेळी मुख्य प्रवर्तक / संस्थापक मा.श्री. रमेश जैद, राज्यकर सह आयुक्त (अपील) कोंकण विभाग (से.नि.) तथा सदस्य, महाराष्ट्र विक्रिकर न्यायाधिकरण, मुंबई.

श्री. दिलीप आहिरे श्री. अजित न्यायनिरगुणे श्री. निलेश कांबळे श्री. नितीन सुर्वे श्री. दिनकर आरोटे श्री. गणेश जाधव श्री. राम कुमकाले श्री. बसवेश्र्वर वसमनी, श्री. नारायण शिंदे श्री. हरिभाऊ टापरे, श्री. रविंद्र खोपटकर श्री. रघुनाथ पाटील . सदर कार्यक्रमांमध्ये शास्त्रांचे प्रदर्शन आयोजीत करण्यात आली होती. रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले यामध्ये २५४ रक्तदात्यानी रक्तदान केले. यामध्ये माजी सैनिक व एनसीसी कॅडेट यांनी वरचढ भाग घेतला. तसेच शासकिय व निमशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सुद्धा भाग घेतला. या कार्यक्रमाला टाटा मेमोरियल हॉस्पिटल ब्लड बँक व नवी मुंबई महानगर पालिका रक्त केंद्र यांच्या सौजन्याने हा रक्त संकलनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.सदर कार्यक्रमांमध्ये काही मान्यवरांचे आवर्जून प्रमुख




उपस्थिती आजी-माजी सैनिक बहुउद्देशीय वेल्फेअर असोसिएशन महाराष्ट्र राज्य अध्यक्ष सुभेदार प्रदीप गायकवाड साहेब, ऑ.कॅप्टन बाबू कोलके साहेब, मार्गदर्शक, राज्यउपाध्यक्ष शिवपुत्र घटकामले, मार्गदर्शक ॲड.राजेंद्रकुमार खोब्रागडे, सुभेदार वसंत मस्के साहेब, सैनिक सदर कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली होती आजचा कार्यक्रम अविस्मरणीय असा आनंदमय आणि सुखमय वातावरणात संपन्न झाली

# सोलापूर जिल्ह्यातील लहुजी शक्ती सेनेच्या शाखा उद्घाटनाचे आयोजन

सोलापूर/प्रतिनिधीः लहुजी शक्ती सेना सोलापूर जिल्हा यांच्या वतीने पंधरा शाखांचे उद्घाटन लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष श्री विष्णू कसबे यांच्या शुभहस्ते होणार आहे.



पश्रि्चम महाराष्ट्र अध्यक्ष श्री महादेव महाराज भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सोलापूर जिल्हा अध्यक्ष श्री वसंत देडे यांच्या नेतृत्वाखाली या शाखांचे दि. २० जानेवारी रोजी दिवसभरात संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात उद्घाटन होणार आहे. या प्रसंगी लहुजी शक्ती सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्राचार्य डॉ.माधवराव गादेकर ,प्रदेशाध्यक्ष श्री कैलास खंदारे ,राज्य प्रवक्ते प्रा. डॉ.मारुती लोंढे, प्रदेश उपाध्यक्ष श्री शिवाजी गायकवाड ,युवक प्रदेश उपाध्यक्ष रोहित खलसे व इतर मान्यवर व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष श्री वसंत देडे यांनी दिली.

सदर कार्यक्रमासाठी पश्रि्चम महाराष्ट्र कार्याध्यक्ष खंडोबा बनसोडे, राज्य संघटक संजय कदम ,पश्रि्चम महाराष्ट्र कोर कमिटी अध्यक्ष सुधाकर पाटोळे, राज्य सचिव दत्ता जगताप ,युवक तालुकाध्यक्ष श्री राहुल कांबळे शहराध्यक्ष योगेश सोनवणे, युवक जिल्हाध्यक्ष सागर लोखंडे ,आनंद भाऊ कांबळे ,विक्रम कसबे ,तालुका अध्यक्ष सुनील कसबे ,देविदास कसबे ,जयसिंग मस्के, मुकुंद घाडगे यांनी परिश्रम घेतले.

# एस.जी.परमशेट्टी प्रशालेचा सहल यंदा नेपाळला



दुधनी : अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील श्री शांतलिंगेश्र्वर शिक्षण प्रसारक संस्था हिरेजेवरगी - दुधनी संचालित श्री एस जी परमशेट्टी प्रशालेचा या चालू शैक्षणिक वर्षाचा सहल नेपाळ या देशाला जाणार असून १६ जानेवारीला सिद्धेश्र्वर एक्सप्रेस ने जाणार असून २५ जानेवारीला उद्यान एक्सप्रेस ने परत येणार आहे सहलीचा प्रवास असे दुधनी ते सोलापूर सोलापूर ते कल्याण कल्याण ते गोरखपुर गोरखपूर ते पोखरा पोखरा ते काठमांडू काठमांडू ते लुंबिनी करून परतीचा प्रवास असे एकूण दहा दिवसाचा प्रवास असून परमशेट्टी प्रशालेचा शैक्षणिक सहल पहिल्यांदाच परदेशी दौऱ्यावर जात आहे यासाठी तीन महिने अगोदरच रेल्वे आरक्षण सर्व विद्यार्थ्यांचा केलेले असून यात एकूण ७७ विद्यार्थिनी व १४ शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी टोटल ९१ जण जाणार आहेत या शैक्षणिक सहलीसाठी लागणारे कागदपत्र व शिक्षणाधिकाऱ्यांचा परवानगी सर्व नियमांचे पालन करून जाणार आहे अशी माहिती प्रशालेचे सहप्रमुख दत्तात्रय हिळळी यांनी सांगितले नेपाळ या ठिकाणी पोखरा येथील डेव्हिल फॉल्स विंध्यवासिनी मंदिर गुप्तेश्र्वर मंदिर फेवा लेक व सूर्यास्ताचा आनंद घेणार आहेत तसेच काठमांडू येथे बुडा नीलकंठ मंदिर स्वयंभूनाथ मंदिर बुद्ध मंदिर पशुपतिनाथ मंदिर भक्तपूर करून सोनाली बॉर्डर कडे जाताना मनोकामना देवीचे रोपवेन दर्शन घेणार आहेत तसेच लुंबिनी येथे बुद्ध जन्म स्थानाचे बुद्धांचे दर्शन घेऊन परतीचा प्रवास सुरू होणार आहे या सर्व विद्यार्थ्यांचा काळजी घेण्यासाठी व सहल व्यवस्थित पार पडण्यासाठी सर प्रमुख दत्तात्रय उपप्रमुख राजशेखर पाटील सुरेश बिराजदार नागराज कलबुर्गी परमेश्र्वर कोळी मलया स्वामी माहालिंग सोमेश्र्वर चंद्रशेखर खंडाळा अविनाश भैरुणगी प्रियांका पावली लक्ष्मी माळी श्रुती दिवटे देसूराव राठोड यांनी परिश्रम देणार आहेत मुख्याधापक आर जी आलिगावे पर्यवेक्षक एल एस गददी यांनी शुभेच्छा दिल्या

# बार्शी येथे छत्रपती चषक २०२४ चे उद्घाटन

बार्शी/प्रतिनिधी : छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंती निमित्त राज-विजय क्रिडा,सांस्कृतिक व शैक्षणिक मंडळ, ठ.उ.उ क्रिकेट क्लब, ३८०९ राऊत चाळ, बार्शी आयोजित राज्यस्तरीय भव्य टेनिस बॉल तालुका वाईज डे-नाईट क्रिकेट स्पर्धा भारतीय जनता पार्टी नमो चषक भव्य क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव अंतर्गत छत्रपती चषक २०२४ चे उद्घाटन सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद,आमदार राजाभाऊ राऊत, पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण शिरीष सरदेशपांडे यांच्या हस्ते पार पडले.यावेळी डॉ.बी.वाय यादव,बार्शी नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष आसिफभाई तांबोळी, वैरागचे नेते संतोष निंबाळकर, गटनेते विजय (नाा) राऊत, रमेश पाटील, रावसाहेब मनगिरे मालक, विलास रेणके, प्रशांत कथले, सुभाष लोढा,रणवीर राऊत, प्रमोद वाघमोडे, मदन दराडे, नवनाथ चांदणे,शंकर वाघमारे तसेच सर्व आजी-माजी नगरसेवक, जि.प. व पं.स. सदस्य,सर्व संचालक कृ.उ.बाजार समिती,भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्य बँकेची फसवणूक केल्याप्रकरणी श्री विठ्ठल कारखान्याचे संचालक मंडळ यांचे विरूध्द दाखल तक्रार अर्जाचा खुलासा

पंढरपूर/प्रतिनिधी : काही स्थानिक वर्तमान पत्रामध्ये श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक मंडळावर तक्रारीबाबत समाज माध्यमांमध्ये (सोशल मिडिया) फिरताना (व्हायरल) दिसून येत आहेत. या विषयातील तथ्य जाणून न घेता श्री विठ्ठल कारखान्याच्या चांगल्या कारभाराच्या विरोधातील घटकांकडून जाणीवपूर्वक संभ्रम निर्माण केला जात असल्याचे लक्षात आल्याने सभासदांसाठी हा खुलासा जाहीर करण्याची आवश्यकता निर्माण झाली.




**✻ चेअरमन अभिजीत पाटील आणि विद्यमान संचालकांनी हे कर्ज घेतले होते का?**

नाही. ज्या कर्जाबाबत बातमी प्रसिद्ध होत आहे, ते कर्ज मुळात कारखाना बंद पाडणाऱ्या पूर्वीच्या संचालक मंडळाने घेतले होते. तत्कालीन संचालक मंडळाने नियमित कर्जाची परतफेड न केल्याने सर्व कर्जखाती ही सन २०२१ पूर्वीच बँकेने एन.पी.ए. म्हणून घोषित केलेली होती व जप्तीची कार्यवाही देखील सुरू झाली होती.

**✻ मागील संचालक मंडळामुळे सभासद आणि कारखाना अडचणीत कसा?**

महाराष्ट्र राज्य बँकेने कारखान्याला दिलेल्या पहिल्या कर्जाचा विनियोग न पाहता बँकेने वेळोवेळी तत्कालीन संचालक मंडळाला कर्ज रूपाने मदत केली. यामध्ये केवळ तत्कालीन संचालक मंडळ यांच्या गलथान कारभारामुळे संस्थेवर कर्जबाजारी होण्याची वेळ आलेली आहे.

एकंदरीत ६०० कोटींच्या आसपास त्यांनी कर्ज करून ठेवले होते. त्यांनी साखर विकली पण सभासदांची बिले दिली नाहीत. जवळपास ३० महिने कर्मचाऱ्यांचा पगार थकवला होता. २०१६ पासून तोडणी वाहतूक यांचेही असंख्य बिल थकवले होते. तसेच ३० कोटी उसाचे बिल बुडवून जुने संचालक मंडळ पळ काढण्याच्या परिस्थितीत होते.

**✻ चेअरमन व विद्यमान संचालकांनी कारखाना कसा चालू केला?**

(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ (अ) अन्वये पारित करण्यात आलेल्या राज्य शासनाच्या निर्देशान्वये)

सन २०२२-२३ चा हंगाम सुरू होण्यापूर्वी महाराष्ट्र राज्य बँकेच्या ताब्यातील जुनी १,०९,९७३ क्विंटल साखर विक्री करून येणाऱ्या रक्कमेतून १/३ रक्कम अंदाजित रू.११.३६ कोटी बँकेला व ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना २/३ म्हणजे रू.२२.७३ कोटी द्यावयाचे होते. शासनाच्या निर्देशानुसार साखर विक्रीतून सभासदांना देण्याची रू.२२.७३ कोटी ही मोठी रक्कम संचालक मंडळाने बाहेरून उभी करावी पण बँकेला साखर विक्रीची पूर्ण रक्कम भरावी असे सांगण्यात आले.त्याप्रमाणे साखरेच्या लिलावामधून आलेली सर्व रक्कम रू.३०.७७ कोटी बँकेच्या कर्जासाठी कारखान्याने भरणा केलेला आहे.

**✻ विद्यमान संचालक मंडळाने कारखाना सुरू करण्यासाठी निस्वार्थी भावनेने काय केले?**

स्वतःच्या मालमत्ता गहाण ठेऊन कर्ज काढून शेतकऱ्यांची (मागच्या संचालक मंडळाने बुडवलेली) थकीत रक्कम स्वतः भरली!!!

कारखाना सुरू करण्यासाठी, शेतकऱ्यांच्या हितासाठी बँकेचा प्रस्ताव मान्य करून स्वतःच्या मालमत्ता गहाण ठेवून निधी उभा करून थकीत ऊस बिले साधारण रू. ३०.०९ कोटी रूपयांची (एफ.आर.पी.) विद्यमान संचालक मंडळाने शेतकऱ्यांना अदा केलेली आहेत. तेही शब्द दिल्याप्रमाणे मोळी टाकायच्या आधी! सन २०२२-२३ गळीत हंगाम सुरू करण्यासाठी नवीन संचालक मंडळाने आठच दिवसात निर्णय घेऊन २ वर्ष बंद असलेल्या कारखान्याची देखभाल व दुरूस्तीची कामे हाती घेण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच कर्मचारी कामावर रुजू करून घेण्यात आले.परिस्थितीवर मात करून सन २०२२-२३ चा गळीत हंगाम सुरू करण्यासाठी संचालक मंडळाने स्वतःच्या मालमत्ता गहाण ठेवून, सन २०२२-२३ चा गळीत हंगाम सुरू करून ७.२७ लाखा टन गाळप करून शेतकऱ्यांना रू.२५००/- प्रमाणे ऊस बिल रक्कम वेळेत अदा करून, सिझन यशस्वीरित्या पार पाडला ! तसेच तोडणी वाहतूक कमीशन देण्यात आले आणि नियमित पगार वाटप करण्यात आले.

आज जिल्ह्यात उसाची बिलाची स्पर्धा सुरू झाली. शेतकऱ्यांमध्ये विश्र्वासाचे वातावरण निर्माण झाले. यंदाच्या हंगामात देखील ५ लाख ६० हजार गाळप पूर्ण झाले असून परिसरातील शेतकरी बांधवांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सर्व संचालक व कर्मचारी काम करत आहेत.

**✻ तात्पर्य :**वस्तुतः कारखान्याची सर्व बँक खाती एन.पी.ए. मध्ये असल्यामुळे नवीन संचालक मंडळ आल्यानंतर कारखान्याला कर्ज पुरवठा झालेला नाही.सदर हंगामातील झालेल्या उत्पन्नातून केवळ आणि केवळ शेतकरी सभासद, कामगार व उत्पादन खर्च यावरच विनियोग केलेला आहे. याचा सविस्तर लेखाजोखा कारखान्याचे वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सर्व सभासदांसमोर मांडलेला आहे. यामुळे कारखान्याच्या संचालक मंडळाने कसलीही रक्कम वैयक्तिक लाभासाठी वापरलेली नाही हे स्पष्ट होते.

**✻ कारखान्याच्या स्पर्धेमुळे राजकीय शक्ती कमी करण्याचा प्रयत्न?**

सद्यःस्थितीत कारखाना सुस्थितीत चालु असल्यामुळे काही राजकीय नेत्यांना दुखू लागल्याचे जाणवते, त्यामुळेच केवळ राजकीय वैमनस्यातून किंवा कारखान्याला अडचणीत आणण्याच्या उद्देशानेसंभ्रम निर्माण केला जात आहे. बँकेसोबत कर्ज पुनर्गठन, हप्ते पाडून घेणे, वित्त नियोजन यासंदर्भात चर्चा सुरू असून लवकरच तक्रारीवर तोडगा काढण्यात येईल. संचालक मंडळाचा न्याय व्यवस्थेवर, सभासदांवर व बँकेवर पुर्ण विश्र्वास असून चौकशीअंती यावर योग्य तो निर्णय होईल. अशी माहिती चेअरमन अभिजीत पाटील यांनी दिली.

# हन्नूरच्या अनंत चैतन्य प्रशालेत स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांना अभिवादन



अक्कलकोट /प्रतिनिधीः आधुनिक राष्ट्रवादाचे जनक, पाश्र्चात्त्य जगाला वेदांत आणि योगाचे परिचय करून देणारे महान व्यक्तिमत्त्व महर्षि स्वामी विवेकानंद व धैर्य, कर्तव्य व स्वाभिमान याचे मूर्तिमंत प्रतीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व गरीब रयतेच्या सुखासाठी स्वतंत्र स्वराज्याची छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनी चेतना पेटवणाऱ्या थोर जननी राजमाता जिजाऊ यांची जयंती आज शुक्रवार दिनांक १२ जानेवारी २०२४ रोजी महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्य. व उच्च माध्यमिक प्रशाला हन्नूर येथे साजरी करण्यात आली. प्रारंभी प्रशालेचे जेष्ठ शिक्षक श्री. ज्ञानदेव शिंदे व श्री. विश्र्वनाथ चव्हाण यांच्या हस्ते या महान विभुतींच्या प्रतिमेचे पुजन करुन अभिवादन करण्यात आले. तद्नंतर प्रशालेचे जेष्ठ सहकारी, मराठी विभाग प्रमुख श्री. शहाजी माने सर व सांस्कृतिक विभाग सहाय्यिका सौ. जमदाडे मॅडम यांनी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाबाई यांच्या जीवन कार्याविषयी सविस्तर माहिती विषद केली.यावेळी मुख्याध्यापक श्री. विलास बिराजदार, पर्यवेक्षक श्री. अशोक साखरे, सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते चार हुतात्मा पुतळा परिसरातील सुशोभीकरणाचे लोकार्पण



सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर शहरातील पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर पुतळा व चार हुतात्मा पुतळा या सुशोभीकरणाचे कामाचा लोकार्पण सोहळा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

यावेळी हुतात्मा मल्लप्पा धनशेट्टी, हुतात्मा श्रीकिसन सारडा,हुतात्मा जगन्नाथ शिंदे, हुतात्मा अ.कुर्बान हुसेन यांच्या पुतळ्यास व पुण्यश्र्लोक आहिल्या देवी होळकर यांच्या पुतळ्यास पालकमंत्री चंद्रकांत (दादा)पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर हुतात्मा मल्लप्पा धनशेट्टी यांचे वंशज श्रीमती अन्नपूर्णा धनशेट्टी व हुतात्मा जगन्नाथ शिंदे यांचे नातू महादेव दीनानाथ शिंदे तसेच हुतात्मा कुर्बान हुसेन यांचे वंशज (मुलीचा मुलगा)हसीमोद्दीन शेख यांचा सन्मान पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी नरेंद्र काळे, नगर अभियंता सारिका आकूलवार, उपअभियंता किशोर सातपुते, कनिष्ठ अभियंता परशुराम भुमकंटी, बिरू बंडगर, विजयकुमार गावडे आदी मान्यवर उपस्थित होते.✻महापालिका इमारतीला भेट -

स्मार्ट सिटी योजने अंतर्गत सोलापूर शहरातील वारसा स्थळापैकी सोलापूर महानगरपालिकेची इंद्रभुवन या इमारतीचे नुतनीकरण कामास पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली-उगले यांनी इंद्रभवन इमारतीचे नूतनीकरण संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना दिली. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, अतिरिक्त आयुक्त निखिल मोरे, उपायुक्त मच्छिंद्र घोलप, उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, नगर अभियंता सारिका आकूलवार, उप अभियंता युसुफ मुजावर यांच्यासह महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

# माध्यमिक शिक्षकांच्या पतसंस्थेकडून मंगरूळे प्रशालेस जिल्हास्तरीय आदर्श शाळा पुरस्कार

अक्कलकोट/प्रतिनिधीः दिनांक १४ जानेवारी रोजी सिंहगड कॉलेजमध्ये संपन्न झालेल्या माध्यमिक शिक्षकांसाठी कार्यरत असलेली बाळे पतसंस्थेकडून अक्कलकोट येथील मंगरूळे प्रशालेस जिल्हास्तरीय आदर्श शाळा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

मंगरूळे प्रशाला ही अक्कलकोट तसेच सोलापूर जिल्ह्यातील एक नामवंत शाळा असून, प्रशालेने शालेय अभ्यासक्रमाबरोबर विज्ञान प्रदर्शन, क्रीडा क्षेत्रात राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त केले असल्याने शाळेची निवड आदर्श शाळा म्हणून घोषित करण्यात आले. माजी आमदार दत्तात्रेय सावंत आणि बाळे पतसंस्थेचे चेअरमन आणि संचालक यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला .

याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक नंदाजी कदम, उपमुख्याध्यापक मल्लिनाथ पाटील, पर्यवेक्षिका आरती तोळणूरे, संगीता कडबगावकर, कांचनमाला लोके, नीलकंठ दिंडोरे, रमेश उमाटे, प्रशांत पाटील, सचिन डफळे ,संगमेश्र्वर निगदळे



, धानय्या कौटगी, संतोष आगरखेड, प्रशांत पाटणे, बसवराज मणूरे, संजय उपिन, महांतेश मठपती, विश्र्वनाथ पाटील गिरीश पट्टेद, अरविंद बिरादार ,अजित धनशेट्टी, सिद्धेश्र्वर घुगरे, काशिनाथ मणूरे आधी शिक्षक उपस्थित होते.

# शेतीसाठी उजनीतून १२ फेब्रुवारीपर्यंत पाणी; पावसाळ्यापर्यंत धरणातील साठा पिण्यासाठीच

सोलापूर/प्रतिनिधीः उजनी धरणातून आता शेतीसाठी डाव्या व उजव्या कालव्यातून पाणी सोडले आहे. अडीच हजार क्युसेकचा विसर्ग आता गरजेनुसार दोन हजार ८०० ते तीन हजारांपर्यंत करण्यात आला आहे. शेतीसाठी सोडलेले पाणी आता १२ फेब्रुवारीपर्यंत सुरूच राहणार आहे.उजनीत सध्या उपयुक्त पाणीसाठा ३ टीएमसीपर्यंत असून एकूण धरणात ६६.९० टीएमसी पाणी शिल्लक आहे. त्यात १६ ते १८ टीएमसीपर्यंत गाळ आहे. त्यामुळे शेतीचे आवर्तन संपल्यावर धरणातील पाणी केवळ पिण्यासाठीच राखीव ठेवले जाणार आहे.

पावसाळ्यापर्यंत उजनीतून सोलापूर शहरासाठी भीमा नदीतून किमान दोनवेळा पाणी सोडावे लागणार आहे. दुसरीकडे धाराशिव, कर्जत- जामखेड, इंदापूर, बारामती या शहरांसह सोलापूर शहर व सोलापूर जिल्ह्यातील १००पेक्षा अधिक ग्रामपंचायती, नगरपालिकांना उजनीतूनच पाणी पुरवठा होतो.पण, यंदाच्या पावसाळ्यात उजनी अवघी ६६ टक्क्यांपर्यंतच भरले होते. त्यानंतर शेतीसाठी दोनवेळा आवर्तने सोडण्यात आली. सोलापूर शहरासाठीही एक आवर्तन सोडले. त्यामुळे धरण आता ६ टक्क्यांवर आले आहे.उजनीतील साठा कमी झाल्यावर कॅनॉलमधून पाणी सोडता येत नाही. धरण उणे २० टक्के झाल्यावर नदीशिवाय पाणी सोडता येत नाही. पावसाळ्यापर्यंत धरणातील पाणीसाठा उणे ५० टक्क्यांवर आहे.